Test Booklet Code & No.
प्रश्नपत्रिका कोड व क्र.

**A**

# Paper-III
# HISTORY

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ........................................
   (Name) ................................................
2. (Signature) ........................................
   (Name) ................................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ............................................................
(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## MAY - 10316

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **40** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **75** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा.** : जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# HISTORY
## Paper III
# इतिहास
## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions. Each question carries **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Early food-producing societies (farming societies) emerged in Baluchistan and northern fringes of Vindhyas in :

(A) 1000–500 BCE

(B) 7000–3000 BCE

(C) 3000–2000 BCE

(D) 2000–1000 BCE

2. The following scholar did *not* excavate any Harappan site :

(A) Rakhaldas Banerji

(B) Madho Swarup Vats

(C) Daya Ram Sahni

(D) V. Gordon Childe

1. अन्नाचे उत्पादन करणाऱ्या (शेती) सुरुवातीच्या समूहांचा उदय ........................ या कालखंडात बलुचिस्तान आणि विंध्य पर्वतांच्या उत्तररांगांत झाला.

(A) इ.स.पू. 1000–500

(B) इ.स.पू. 7000–3000

(C) इ.स.पू. 3000–2000

(D) इ.स.पू. 2000–1000

2. ........................ या संशोधकाने कोणत्याही हडप्पा संस्कृतीच्या स्थानाचे उत्खनन केले **नाही**.

(A) राखालदास बॅनर्जी

(B) माधो स्वरूप वत्स

(C) दया राम साहनी

(D) व्ही. गॉर्डन शिल्ड/चाइल्ड

3. The Harappan seals were made from the material named :

(A) Chalcedony

(B) Steatite

(C) Quartz

(D) Lapis-Lazuli

4. 'Adipurana' was composed by :

(A) Somadeva

(B) Jinasena

(C) Varahamihir

(D) Ashvaghosha

5. In routine time-table of King, Kautilya divided night into ............ parts.

(A) Five

(B) Six

(C) Seven

(D) Eight

3. हडप्पातील मुद्रा या ........................ द्रव्यापासून बनवल्या गेल्या.

(A) चाल्सेडोनी

(B) स्टीटाइट

(C) क्वार्ट्झ्

(D) लेपिस-लाझुली

4. आदिपुराण ............................ यांनी रचले.

(A) सोमदेव

(B) जिनसेन

(C) वराहमिहीर

(D) अश्वघोष

5. राजाच्या दिनक्रमामध्ये कौटिल्याने रात्रीचे ............................ भाग केले.

(A) पाच

(B) सहा

(C) सात

(D) आठ

6. According to Jataka stories, which of the following officers were collecting taxes from the people ?

(A) Rajjuka and Dandin

(B) Bhagkara and Bhagaduta

(C) Tundiyas and Akasiyas

(D) Purohita and Rajacharya

7. Which new officer was appointed by Ashoka during his reign ?

(A) Pradeshik

(B) Dharma Mahamatra

(C) Yukta

(D) Rajuka

6. जातक कथानुसार लोकांकडून कर गोळा करण्याचे काम कोण करत होते ?

(A) रज्जुक व दण्डिन्

(B) भागकर व भागदुत्

(C) तुंदियस् व अकसियस्

(D) पुरोहित व राजाचार्य

7. अशोकाने आपल्या राज्यकालात कोणत्या अधिकाऱ्याची नव्याने नेमणूक केली ?

(A) प्रादेशिक

(B) धर्म महामात्र

(C) युक्त

(D) राजुक

8. The following site doesn't have rock-art :

(A) Maski

(B) Bhim-betka

(C) Piklihal

(D) Daimabad

8. पाषाण-कलेचे नमुने ........................ या ठिकाणी नाहीत.

(A) मास्की

(B) भीमबेटका

(C) पिक्लिहाल

(D) दायमाबाद

9. Which of the following is *not* a part of Bhartrihari's Trishataka ?

(A) Niti Shatak

(B) Shringar Shatak

(C) Vairagya Shatak

(D) Achar Shatak

9. खालीलपैकी कोणते भृर्तहरीच्या तीन शतकांचा भाग **नाही** ?

(A) नीती शतक

(B) श्रृंगार शतक

(C) वैराग्य शतक

(D) आचार शतक

10. Which of the following pairs is correctly matched ?

(A) Samudragupta — Allahabad Pillar Inscription

(B) Skandagupta — Bhitari Pillar Inscription

(C) Buddhagupta — Eran Stone Pillar Inscription

(D) Chandragupta — Hathigumpha Inscription

10. खालीलपैकी कोणती जोड़ी योग्य आहे ?

(A) समुद्रगुप्त – अलाहाबाद स्तंभलेख

(B) स्कंदगुप्त – भीतरी स्तंभलेख

(C) बुद्धगुप्त – एरन पाषाण स्तंभलेख

(D) चंद्रगुप्त – हाथीगुंफा शिलालेख

11. Theory of 'Shunyawada' is attributed to :

(A) Upali

(B) Anand

(C) Nagarjun

(D) Bavari

11. शुन्यवादाच्या सिद्‌धांताचे श्रेय कोणाला दिले जाते ?

(A) उपाली

(B) आनंद

(C) नागार्जुन

(D) बावरी

12. Who employed broken men theory to explain emergence of untouchability in India ?

(A) G.S. Ghurye

(B) Dumont

(C) M.N. Shriniwasan

(D) Dr. B.R. Ambedkar

13. According to Dr. Ambedkar who was the author of Manu Samhita ?

(A) Vaivswat Manu

(B) Vyas

(C) Valmiki

(D) Sumati Bhargav

12. भारतातील अस्पृश्यतेच्या उदयाचे स्पष्टीकरण करण्यासाठी समाजखंडीत लोक (ब्रोकन मेन) सिद्धांत कोणी मांडला ?

(A) जी. एस. घुर्ये

(B) ड्युमो

(C) एम. एन. श्रीनिवासन

(D) डॉ. बी. आर. आंबेडकर

13. डॉ. आंबेडकरांच्या मताप्रमाणे मनुसंहिता कोणी लिहिली ?

(A) वैवस्वत मनु

(B) व्यास

(C) वाल्मिकी

(D) सुमती भार्गव

14. Which of the following Rashtrakuta rulers patronised Jainism ?

(A) Dantidurga

(B) Krishna II

(C) Amoghvarsha

(D) Krishna I

14. खालीलपैकी कोणत्या राष्ट्रकूट राजाने जैनधर्माला आश्रय दिला ?

(A) दंतीदुर्ग

(B) कृष्ण दुसरा

(C) अमोघवर्ष

(D) कृष्ण पहिला

15. Which of the following historians has depicted Gupta age as golden age of India ?

(A) Romila Thapar

(B) D.N. Zha

(C) R.C. Mazumdar

(D) R.S. Sharma

15. खालीलपैकी कोणत्या इतिहासकाराने गुप्त काळाला भारताचा सुवर्णकाळ म्हणून चितारले ?

(A) रोमिला थापर

(B) डी. एन. झा

(C) आर. सी. मजुमदार

(D) आर. एस. शर्मा

16. Which of the following is *not* the feature of Indian feudalism ?

(A) Lord-Serf relationship

(B) Use of extra economic coercion

(C) Land grants as Agrahara and Brahmadeya

(D) Localization of trade

17. Who was the adoring deity of Alvar saints ?

(A) Shiva

(B) Shakti

(C) Vishnu

(D) Ram

16. खालीलपैकी कोणते भारतीय सरंजामशाहीचे वैशिष्ट्य **नाही** ?

(A) स्वामी-भूदास संबंध

(B) आर्थिकेतर बळजोरीचा अवलंब

(C) अग्रहार व ब्रह्मदेय अशी दानपत्रे

(D) व्यापाराचे स्थानिकीकरण

17. अलवार संताची प्रिय देवता कोणती ?

(A) शिव

(B) शक्ती

(C) विष्णु

(D) राम

18. The head of the military department during Delhi Sultanate was called as :

(A) Arz-i-Mumalik

(B) Sadr-us-Sadur

(C) Barid-i-Mumalik

(D) Amir Munshi

19. '*Vishti*' is referred as .................. .

(A) King's share

(B) A coin

(C) A unit area of land

(D) Forced labour

20. Which Mughal Emperor had introduced the 'Duaspa-Sihaspa' in Mansabdari system ?

(A) Akbar

(B) Jehangir

(C) Shah Jahan

(D) Aurangzeb

18. दिल्ली सल्तनतकाळात लष्करी विभागाच्या प्रमुखाला काय म्हटले जाई ?

(A) अर्ज-इ-मुमालीक

(B) सदर-उस-सदर

(C) बरीद-इ-मुमालीक

(D) अमिर मुन्शी

19. 'विष्टी' म्हणजे काय ?

(A) राजाचा वाटा

(B) एक नाणे

(C) जमिनीच्या क्षेत्राचे एकक

(D) वेठविगारी

20. कोणत्या मुघल सम्राटाने मनसबदारी पद्धतीमध्ये 'दुअस्पा-सिहस्पा' प्रणाली लागू केली ?

(A) अकबर

(B) जहांगिर

(C) शहाजहान

(D) औरंगजेब

21. The factor mainly responsible for widespread revolts by the Jats, the Satnamis, the Bundelas and the Sikhs after the reign of Aurangzeb was :

(A) The reactionary policy of Aurangzeb

(B) General discontent of the masses

(C) Agrarian crisis in the Mughal Empire

(D) The wars of succession and the consequent political crisis

22. Which one of the following Sufi sects adopted itself most to Indian conditions ?

(A) Naqshabandi

(B) Quadiri

(C) Suharawardi

(D) Chishti

21. औरंगजेबोत्तर काळात जाट, सतनामी, बुंदेला आणि शिख यांनी सर्वदूर केलेल्या बंडासाठी कोणता घटक मुख्यत: जबाबदार होता ?

(A) औरंगजेबाचे प्रतिगामी धोरण

(B) जनतेमधील असंतोष

(C) मुघल साम्राज्यामधील शेतीव्यवस्थेचे अरिष्ट

(D) वारश्याचे युद्ध आणि त्यामुळे निर्माण झालेले राजकीय अरिष्ट

22. भारतीय परिस्थितीशी सर्वाधिक जुळवून घेणारा सुफी पंथ कोणता ?

(A) नक्शबंदी

(B) कादरी

(C) सुहरावर्दी

(D) चिश्ती

23. What was meant by 'Amaram' in the Vijayanagar Empire ?
    (A) Lease system of cultivation
    (B) Territory assigned to military chiefs
    (C) Lands donated to the Brahmins
    (D) The chief judge after the king

24. In what way did the internal administrative system of the Mughals contribute to the disintegration of the Empire ?
    (A) The Nizam hastened the process of administrative collapse
    (B) It was highly centralized and could not be properly managed by incompetent rulers
    (C) The Rajput chieftains again became powerful
    (D) There was no proper co-ordination among the departments and the provinces

23. विजयनगर साम्राज्यामध्ये 'आमरामचा' अर्थ काय होत होता ?
    (A) लागवडीचा मक्ता देणारी पद्धत
    (B) लष्करी प्रमुखाना दिला गेलेला मुलूख
    (C) ब्राह्मणांना दिलेली जमिन
    (D) राजा नंतर मुख्य न्यायाधीश

24. मुघलांच्या अंतर्गत प्रशासनपद्धतीने साम्राज्याच्या विघटनामध्ये कोणत्या प्रकारचे योगदान दिले ?
    (A) निझामाने प्रशासकीय पतनाच्या प्रक्रियेची गती वाढवली
    (B) आधिक केंद्रवर्ती स्वरूप असल्यामुळे दुबळ्या राज्यकर्त्यांना त्याचे व्यवस्थापन जमले नाही
    (C) राजपूत राजे पुनः शक्तीशाली बनले
    (D) विभाग आणि प्रदेशांमध्ये कोणताही समन्वय नव्हता

25. What is 'ijarah' ?
   (A) Awarding the privilege of collection of land revenue to the highest bidder
   (B) Collecting land revenue from temple lands
   (C) Dividing the land on the pattern of cultivation
   (D) All of the above

26. Who among the following believed that architecture, agriculture, tailoring and weaving were "necessary crafts" ?
   (A) Ibn-Khaldun
   (B) Ibn-ul-Arabi
   (C) Ibn Sena
   (D) Al Jabr

25. 'इजराह' म्हणजे काय ?
   (A) जास्तीची बोली लावणाराला सारावसुलीचा विशेषाधिकार देणे
   (B) मंदिराच्या जमिनीपासून शेतसारा वसूल करणे
   (C) शेतलागवडीच्या प्रणालीप्रमाणे जमिनीचे वर्गीकरण करणे
   (D) वरील सर्व

26. खालीलपैकी कोणी स्थापत्य, शेती, शिंपीकाम आणि विणकाम या अत्यावश्यक कला असल्याची धारणा बाळगली होती ?
   (A) इब्न-खल्दून
   (B) इब्न-उल-अरबी
   (C) इब्न-सेना
   (D) अल-जब्र

27. Who was the author of "Travels in the Mughal Empire" ?
    (A) Francois Bernier
    (B) Niccollai Mannuci
    (C) Abbe Carre
    (D) Francisco Pelsaert

28. The Jahaz Mahal is in ............ .
    (A) Dhaka
    (B) Mandu
    (C) Chaul
    (D) Vengurla

29. The play 'Matta-vilas-prahasana' was authored by ................. .
    (A) Harsha
    (B) Raja Rajendra
    (C) Jaidev
    (D) Mahendravarman

27. मुघल साम्राज्याचे प्रवासवर्णन कोणी लिहिले ?
    (A) फ्रांकॉइस बर्नियर
    (B) निकोलाय मनुची
    (C) अॅबे कॅरे
    (D) फ्रांसिस्को पल्सार्ट

28. 'जहाजमहल' कोठे आहे ?
    (A) ढाका
    (B) मंडू
    (C) चौल
    (D) वेंगुर्ला

29. 'मत्तविलासप्रहसन' हे नाटक कोणी लिहिले ?
    (A) हर्ष
    (B) राजा राजेंद्र
    (C) जयदेव
    (D) महेंद्रवर्मन

30. What is 'pietra dura' ?

(A) A place where royal ladies stay

(B) The technique of inlaying mosaic with hard and precious stones

(C) Art of building domes on the Tombs

(D) Miniature paintings on the wall

30. 'पिएत्रा ड्युएरा' म्हणजे काय ?

(A) राज स्त्रियांच्या राहण्याचे ठिकाण

(B) संगमरवरी फरशीमध्ये केलेले रत्नांचे जडावकाम

(C) कबरस्थानावर घुमराचे बांधकाम करण्याची कला

(D) भिंतीवरची लघू चित्रकला

31. Where is the 'Adhai-din-Ka Jhopra' ?

(A) Ahmedabad

(B) Agra

(C) Jodhpur

(D) Ajmer

31. अढाई-दिन-का झोपड़ा कोठे आहे ?

(A) अहमदाबाद

(B) आग्रा

(C) जोधपूर

(D) अजमेर

**Paragraph followed by questions (Q. No. 32 to 34) :**

Mansabdars who were granted land revenue equivalent to their salaries were known as jagirdars, and the grant was known as a jagir. The majority of nobles were jagirdars, but there were a few, usually of the lower ranks, who were paid cash salaries out of the state treasury : such Mansabdars were known as naqdi Mansabdars. Rajput princes who joined the Mughal service were Mansabdars, but were, in addition, given back part of their own kingdoms as watan jagirs. This meant that, within these watans, they were still the rulers, with the right to organize cultivation, collect revenue, etc. As part of the Mughal

**परिच्छेदला अनुसरून प्रश्न विचारले आहेत (प्र. क्र. 32 ते 34) :**

आपल्या पदरी असलेल्या सैनिकांच्या पगाराइतका महसूल देणाऱ्या जमिनीचे अधिकार प्राप्त झालेल्या मनसबदाराला जागिरदार म्हणून ओळखले जात होते आणि त्या जमिनीला जागीर म्हणत असत. बहुसंख्य सरदार हे जागिरदार होते. पण त्यात असे काही सरदार असत की ज्यांना राज्याच्या तिजोरीमधून नगदी पगार दिला जात असे. अशा सरदारांना नकदी मनसबदार म्हटले जात असे. मुघल सेवेमध्ये दाखल होणारे राजपूत राजेही मनसबदारच होते. त्यांना त्यांच्या राज्याचा काही भाग वतन वा जागीर म्हणून दिला जात असे. याचा अर्थ असा होतो की जागिरीच्या प्रदेशामध्ये लागवडीचे नियोजन करणे, महसूल गोळा करणे वगैरे अधिकार असलेले ते राज्यकर्ते होते. मुघल सरदार वर्गाचे सदस्य म्हणून त्यांना नियमित मनसबदाराची जबाबदारीही पार पाडावी लागत असे. मुघल राज्याच्या वेगवेगळ्या भुभागांच्या

nobility, they were also regular Mansabdars, who were posted to different parts of the Empire, and who were granted jagirs like other Mansabdars. However, when one ruler died, the Mughal ruler had to confirm the next ruler, and this new ruler was not necessarily the one chosen by the former king.

32. Who was Jagirdar ?

(A) A Mansabdar who was paid in cash

(B) A Mansabdar who was given a grant of land revenue equivalent to his salary

(C) A Mansabdar who was posted in North India

(D) A Mansabdar who was posted in the Deccan

शासनाची जबाबदारी सोपवलेले व इतर मनसबदारांप्रमाणे जागीर मिळालेले मनसबदार म्हणूनही ते काम पाहत. तथापि जेंव्हा एखादा राज्यकर्ता मृत्यू पावत असे तेंव्हा मुघल सत्ताधीशाला उत्तराधिकारी निश्चित करावा लागत असे. हा उत्तराधिकारी पूर्वीच्या राज्यकर्त्याच्या निवडीचा असेलच यांची काही गरज नव्हती.

32. जागिरदार कोण होते ?

(A) नगदी पगार प्राप्त करणारा मनसबदार

(B) पदरी असणाऱ्या सैनिकांच्या पगाराच्या तुलनेत जमिन महसुलाचे अधिकार प्राप्त झालेला मनसबदार

(C) उत्तर भारतामध्ये नेमलेला मनसबदार

(D) दख्खनमध्ये नेमलेला मनसबदार

33. The system of watan jagirs was applied to :

(A) The Rajput nobility

(B) The Maratha nobility

(C) The Irani nobility

(D) The Afghan nobility

34. The grant of the watan jagirs proves the .................. .

(A) Independence of the Rajput rulers

(B) The tributary status of the Rajput rulers

(C) The importance of the Rajputs in the Mughal system

(D) The exclusion of the Rajputs from the Mansabdari system

33. वतनजागीरची पद्धत यांना लागू होते :

(A) राजपुत अमीर

(B) मराठा अमीर

(C) इराणी अमीर

(D) अफगाणी अमीर

34. वतनजागीरीची देणगी हे स्पष्ट करते :

(A) राजपुत राजांचे स्वातंत्र

(B) राजपुत राजांचे मांडलिकत्व

(C) मुघलव्यवस्थेतील राजपुतांचे महत्त्व

(D) मनसबदारी व्यवस्थेतून राजपुतांना बाहेर ठेवणे

35. The battle of Wandiwash was fought between :

(A) the English and the French

(B) the English and the Marathas

(C) the English and Hyder Ali

(D) the English and the Carnatic Nawab

36. Who founded the Asiatic Society of Bengal in 1784 ?

(A) Warren Hastings

(B) William Jones

(C) Henry Princeps

(D) W.W. Hunter

35. वान्दिवाशची लढाई ह्यांच्यात झाली होती :

(A) इंग्रज व फ्रेंच

(B) इंग्रज व मराठे

(C) इंग्रज व हैदरअली

(D) इंग्रज व कर्नाटकी नबाव

36. 1784 ला बंगालच्या एशियाटिक सोसायटीची स्थापना कोणी केली ?

(A) वॉरन हेस्टींग्स

(B) विलियम जोन्स

(C) हेन्री प्रिन्सेप

(D) डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर

37. Match the following and select the *correct* answer from the codes given below :

| | | | |
|---|---|---|---|
| (I) | "Go back to the Vedas" | (*a*) | Poet Iqbal |
| (II) | "We must conquer the world through our spirituality and Philosophy" | (*b*) | Swami Vivekananda |
| (III) | "Tryst with destiny" | (*c*) | Swami Dayananda Saraswati |
| (IV) | "Inquilab Zindabad" | (*d*) | Jawaharlal Nehru |
| | | (*e*) | Mahatma Gandhi |

*Codes* :

| | (I) | (II) | (III) | (IV) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*c*) | (*b*) | (*d*) | (*a*) |
| (B) | (*a*) | (*c*) | (*b*) | (*e*) |
| (C) | (*e*) | (*d*) | (*b*) | (*c*) |
| (D) | (*b*) | (*d*) | (*c*) | (*e*) |

37. जोड्या लावा आणि खालील संकेतांकातून **योग्य** पर्याय निवडा :

| | | | |
|---|---|---|---|
| (I) | वेदांकडे परत चला | (*a*) | कवी इक्बाल |
| (II) | आपल्या तत्त्वज्ञान व अधिभौतिकतेने आपण जग जिंकले पाहिजे | (*b*) | स्वामी विवेकानंद |
| (III) | नियतीशी करार | (*c*) | स्वामी दयानंद |
| (IV) | इन्किलाब झिंदाबाद | (*d*) | जवाहरलाल नेहरू |
| | | (*e*) | महात्मा गांधी |

**संकेतांक** :

| | (I) | (II) | (III) | (IV) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*c*) | (*b*) | (*d*) | (*a*) |
| (B) | (*a*) | (*c*) | (*b*) | (*e*) |
| (C) | (*e*) | (*d*) | (*b*) | (*c*) |
| (D) | (*b*) | (*d*) | (*c*) | (*e*) |

38. Who said "Patriotism is religion and religion is love for India" ?

(A) Bankim Chandra Chatterji

(B) Bal Gangadhar Tilak

(C) Vivekananda

(D) M.G. Ranade

39. Which among the following is *not* a reason for the requirement of increased working capital credit for commercialization of agriculture ?

(A) Commercial agriculture needed more investment

(B) Payment of revenue was in kind

(C) To buy food before harvest, the peasant needed to borrow money

(D) Cash crops were traded over long distances, so there was a greater need for ready money

38. 'देशभक्ती हाच धर्म आहे आणि धर्म म्हणजे भारताबद्दलचे प्रेम' असे कोणी म्हटले ?

(A) बंकीमचंद्र चॅटर्जी

(B) बाल गंगाधर टिळक

(C) विवेकानंद

(D) एम.जी. रानडे

39. शेतीच्या व्यापारीकरणासाठी खेळत्या भांडवलाच्या उपलब्धीची आवश्यकता असण्याचे खालीलपैकी कोणते कारण नव्हते ?

(A) व्यापारी कृषीउत्पादनाला जास्तीच्या भांडवलाची गरज होती

(B) वस्तुरूपाने कर देण्याची सोय होती

(C) शेती करण्याआधी धान्यखरेदी करीता शेतकऱ्याला कर्जावू रक्कमा घ्याव्या लागत

(D) नगदी पिकांचा व्यापार दुरदेशी होत असल्याकारणाने पैशाच्या उपलब्धीची निकड होती

40. Gandhiji's Champaran Movement was started for :

(A) The Security of the Rights of Harijans

(B) To protect the Rights of Women

(C) To solve the Labour Problems

(D) To solve the Problem of Indigo-workers

41. Rabindranath Tagore surrendered his knighthood to the British because of :

(A) Partition of Bengal

(B) Non-co-operation Movement

(C) Jallianwalla Bagh Massacre

(D) Civil Disobedience Movement

40. गांधीजींची चंपारण्य चळवळ कश्यासाठी सुरु झाली होती ?

(A) हरिजनांच्या हक्क संरक्षणासाठी

(B) महिलांच्या हक्क संरक्षणासाठी

(C) कामगारांच्या समस्यांच्या सोडवणूकीसाठी

(D) निळ कामगारांच्या समस्यापूर्तीसाठी

41. सन्मानदर्शक सर ही पदवी रबिंद्रनाथ टागोरांनी ब्रिटिशांना परत केली कारण :

(A) वंगभंग

(B) असहकार चळवळ

(C) जालीयनवाला बाग हत्याकांड

(D) सविनय कायदेभंगाची चळवळ

42. Who was the President of the Congress when it passed a resolution declaring "Poorna Swaraj" to be its future objective ?

(A) Motilal Nehru

(B) Balgangadhar Tilak

(C) Jawaharlal Nehru

(D) Aurobindo Ghosh

43. The first session of the All India Trade Union Congress held in Bombay in 1920 was presided over by :

(A) V.V. Giri

(B) Lala Lajpat Rai

(C) Jawaharlal Nehru

(D) N.M. Joshi

42. 'पूर्ण स्वराज्य' हे आपले उद्दीष्ट्य आहे असे जाहीर करणारा ठराव काँग्रेसने पास केला तेव्हा काँग्रेसचे अध्यक्ष कोण होते ?

(A) मोतीलाल नेहरू

(B) बाळ गंगाधर टिळक

(C) जवाहरलाल नेहरू

(D) अरबिन्द घोष

43. कोणाच्या अध्यक्षतेखाली 1920 ला बॉम्बे येथे झालेले ऑल इंडिया ट्रेड यूनियन काँग्रेसचे पहिले अधिवेशन पार पडले ?

(A) व्ही. व्ही. गिरि

(B) लाला लाजपत राय

(C) जवाहरलाल नेहरू

(D) न. मा. जोशी

44. Who of the following was *not* an extremist leader of the Indian National Congress ?

(A) Lala Lajpat Rai

(B) Balgangadhar Tilak

(C) Gopal Krishna Gokhale

(D) Bipin Chandra Pal

44. खालीलपैकी कोण भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे जहालमतवादी नेते नव्हते ?

(A) लाला लाजपत राय

(B) बाल गंगाधर टिळक

(C) गोपाल कृष्ण गोखले

(D) बिपिन चन्द्र पाल

45. Who was associated with the struggle against Mulshi Dam ?

(A) Keshava Rao Jedhe

(B) Shankar Rao Deo

(C) Senapati Bapat

(D) Bhaskar Rao Jadhav

45. मुळशी धरण विरोधाच्या मोहिमेत कोण सहभागी होते ?

(A) केशवराव जेधे

(B) शंकरराव देव

(C) सेनापती बापट

(D) भास्करराव जाधव

46. Who among the following is *not* part of the Congress Socialist Party ?

(A) Acharya Narendra Deo

(B) Ram Manohar Lohia

(C) Jayaprakash Narayan

(D) Keshav Rao Jedhe

47. Who started the Bhoodan Movement ?

(A) Kakasaheb Kalelkar

(B) Achyut Patawardhan

(C) Jayaprakash Narayan

(D) Vinoba Bhave

48. The Morley-Minto Reforms of 1909 provided for the first time as ....... .

(A) Separate state

(B) Separate communal electorate

(C) Separate educational system

(D) Dominion status

46. खालीलपैकी कोण काँग्रेसच्या समाजवादी पार्टीत सहभागी नव्हते ?

(A) आचार्य नरेन्द्र देव

(B) राम मनोहर लोहिया

(C) जयप्रकाश नारायण

(D) केशवराव जेधे

47. भूदान चळवळ कोणी सुरू केली ?

(A) काकासाहेब कालेलकर

(B) अच्युत पटवर्धन

(C) जयप्रकाश नारायण

(D) विनोबा भावे

48. 1909च्या मोर्ले-मिंटो सुधारणाने पहिल्यांदा काय प्राप्त झाले ?

(A) स्वतंत्र राज्य

(B) जमातआधारीत स्वतंत्र मतदारसंघ

(C) स्वतंत्र शिक्षणपद्धती

(D) साम्राज्यांअतर्गत स्वराज्य

49. Arrange the following events in *correct* chronological order :

(1) Dandi March

(2) Lord Irwin's Declaration

(3) Communal Award

(4) Gandhi-Irwin Pact

(A) (1), (2), (3), (4)

(B) (4), (3), (2), (1)

(C) (1), (3), (2), (4)

(D) (2), (1), (4), (3)

50. The Government of India Act of ........................ separated Burma from India.

(A) 1909

(B) 1919

(C) 1935

(D) 1937

49. योग्य कालक्रमानुसार खालील घटनांची मांडळी करा :

(1) दांडी यात्रा

(2) लॉर्ड इरविन घोषणापत्र

(3) जातीय निवाडा

(4) गांधी-इरविन करार

(A) (1), (2), (3), (4)

(B) (4), (3), (2), (1)

(C) (1), (3), (2), (4)

(D) (2), (1), (4), (3)

50. भारत व ब्रह्मदेश यांना विभक्त करणारा भारत सरकारचा कायदा ................ पारीत झाला.

(A) 1909

(B) 1919

(C) 1935

(D) 1937

51. Given below are two statements, one labelled as Assertion (A) and the other labelled as Reason (R) :

**Assertion (A) :**

The congress decided to boycott the Second Round Table Conference.

**Reason (R) :**

The British Government refused to grant complete Independence for India.

In the above context, of the above two statements which one of the following is *correct* ?

(A) Both (A) and (R) are correct and (R) is the true explanation of (A)

(B) Both (A) and (R) are correct but (R) is not the true explanation of (A)

(C) (A) is correct and (R) is wrong

(D) Both (A) and (R) are wrong

51. खालील विधानांपैकी एक तथ्य (A) आहे आणि दुसरे त्याचे स्पष्टीकरण (R) आहे :

**तथ्य (A) :**

काँग्रेसने दुसऱ्या गोलमेज परिषदेवर बहिष्काराचा निर्णय घेतला.

**स्पष्टीकरण (R) :**

ब्रिटिश सरकारने भारताला पूर्ण स्वातंत्र्य देण्यात नकार दिला.

या विधानांच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान योग्य आहे ?

(A) तथ्य व स्पष्टीकरण दोन्ही योग्य आहेत, आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) तथ्य व स्पष्टीकरण दोन्ही योग्य आहेत, पण (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) तथ्य हे योग्य आहे पण (R) स्पष्टीकरण हे चूक आहे

(D) (A) आणि (R) दोन्ही चूक आहेत

52. "Farasi Prakash", the Persian-Sanskrit dictionary, was compiled by :

(A) Krishnadasa

(B) Haridasa

(C) Purandaradasa

(D) Jaswant Das

53. Who argued that facts and interpretation are inseparable ?

(A) Leopold Von Ranke

(B) V.K. Rajwade

(C) E.H. Carr

(D) James Grant Duff

52. 'फार्सी-प्रकाश' ही पर्शियन-संस्कृत शब्द-कोशाची रचना ........................ यांनी केली.

(A) कृष्णदास

(B) हरिदास

(C) पुरंदरदास

(D) जसवंत दास

53. तथ्ये आणि अन्वयार्थ हे अविभाज्य आहेत असे मत कोणी मांडले ?

(A) लिओपोल्ड फॉन रांके

(B) वि. का. राजवाडे

(C) ई. एच. कार

(D) जेम्स ग्रँट डफ

54. Which among the following is the correct statement about Arnold Toynbee's theory ?

(A) Decline of civilization has three stages : breakdown, disintegration and dissolution

(B) Decline of civilization has three stages : disintegration, dissolution and rebirth

(C) Decline of civilization has two stages : disintegration and dissolution

(D) Decline of civilization has no stages

55. Which of the following historians was the first to argue that caste has a material basis ?

(A) Irfan Habib

(B) R.S. Sharma

(C) A.S. Altekar

(D) V.R. Shinde

54. ऑर्नाल्ड टॉयनबीच्या सिद्धांताबाबत योग्य विधान कोणते ?

(A) संस्कृतीच्या ऱ्हासाचे तीन टप्पे असतात — मोडून पडणे, विघटन आणि विनाश

(B) संस्कृतीच्या ऱ्हासाचे तीन टप्पे असतात — विघटन, विनाश व पुनरुज्जीवन

(C) संस्कृतीच्या ऱ्हासाचे दोन टप्पे असतात — विघटन व विनाश

(D) संस्कृतीच्या ऱ्हासाचे काहीही टप्पे नसतात

55. जातीला भौतिकवादी आधार असल्या वाद खालीलपैकी कोणत्या इतिहासकाराने पहिल्यांदा उपस्थित केला ?

(A) इरफान हबीब

(B) आर. एस. शर्मा

(C) ए. एस. आल्तेकर

(D) व्ही. आर. शिंदे

56. Who opined that "all history is contemporary history" ?

(A) E.H. Carr

(B) Croce

(C) Hegel

(D) Karl Marx

57. Marc Bloc and Lucien Febvre were associated with .................... .

(A) the Romanticist School

(B) the Annale's School

(C) the Prussian historiography

(D) the Neo-Marxist historiography

58. The book — 'Rise of Maratha Power' was authored by ................... .

(A) R.G. Bhandarkar

(B) Vishnushashtri Chiplunkar

(C) M.G. Ranade

(D) D.K. Karve

56. 'सर्व इतिहास समकालीन इतिहास असतो' असे मत कोणी मांडले ?

(A) इ. एच. कार

(B) क्रोसे

(C) हेगेल

(D) कार्ल मार्क्स

57. मार्क ब्लॉक व ल्युसियन फेबव्हरे कशाशी संबंधित आहेत ?

(A) स्वच्छंदतावादी शाखा

(B) अॅनाल शाखा

(C) प्रशियन इतिहासलेखनप्रवाह

(D) नवमार्क्सवादी इतिहासलेखनप्रवाह

58. मराठ्यांच्या सत्तेचा उदय हे पुस्तक यांनी लिहिले :

(A) आर. जी. भांडारकर

(B) विष्णुशास्त्री चिपळूणकर

(C) एम. जी. रानडे

(D) डी. के. कर्वे

59. The hypothesis of 'the Drain of Wealth' was first propounded by :

(A) Dadabhai Naoroji

(B) John Strachey

(C) Gopal Krishna Gokhale

(D) Lala Lajpat Rai

59. आर्थिक नि:सारणाचा सिद्धांत कोणी मांडला ?

(A) दादाभाई नौरोजी

(B) जॉन स्ट्रेची

(C) गोपालकृष्ण गोखले

(D) लाला लाजपत राय

60. Who used Gramsci's theory of 'War of Position' and 'War of Manouevre' in the writing of history ?

(A) Sumit Sarkar

(B) Bipin Chandra

(C) Satish Chandra

(D) Parth Chatterjee

60. ग्रामशीच्या 'भूमिका युद्ध' आणि 'पवित्र्याच्या युद्धाच्या संकल्पना' इतिहास लिहिताना कोणी वापरल्या ?

(A) सुमीत सरकार

(B) बिपिन चंद्रा

(C) सतीश चंद्रा

(D) पार्थ चटर्जी

61. Which tradition of historical thought upheld substantialism and humanism ?

(A) Arabic

(B) Indian

(C) Greek

(D) Asian

62. In which of the following theories do we find the concept of "Surplus value" ?

(A) Positivism

(B) Idealism

(C) Marxism

(D) Liberalism

61. ऐतिहासिक विचारांच्या कोणत्या परंपरेने पदार्थवाद व मानवतावादाचा पुरस्कार केला ?

(A) अरबी

(B) भारतीय

(C) ग्रीक

(D) आशियाई

62. खालीलपैकी कोणत्या सिद्धान्तांत 'अतिरिक्त मूल्य' ही संकल्पना मिळते ?

(A) प्रत्यक्षार्थवादी

(B) आदर्शवादी

(C) मार्क्सवादी

(D) उदारमतवादी

63. The author of the book 'Social Contract' was :

(A) Voltaire

(B) Lenin

(C) Rousseau

(D) Churchill

64. The socio-economic and administrative system that emerged in Europe after the 5th century A.D. was known as the ....................... .

(A) Manorial system

(B) Byzantine system

(C) Commenda system

(D) Roman judicial system

63. 'सामाजिक करार' या ग्रंथाचे लेखन .......... यांनी केले.

(A) व्हॉल्टेअर

(B) लेनिन

(C) रूसो

(D) चर्चिल

64. युरोपात पाचव्या शतकानंतर उदयाला आलेल्या सामाजिक-आर्थिक व प्रशासकीय व्यवस्थेला ......................... असे म्हणतात.

(A) गढीची व्यवस्था

(B) बायझंटाइन व्यवस्था

(C) कमेंडा व्यवस्था

(D) रोमन न्याय व्यवस्था

65. Durand line was between :

(A) British India—Russia

(B) British India—Afghanistan

(C) British India—China

(D) British India—Nepal

66. The book "History of the Decline and Fall of the Roman Empire" was authored by ........................ .

(A) Edward Gibbon

(B) Oliver Goldsmith

(C) Lord Acton

(D) G.R. Elton

67. Fugitive Slave Acts of 1793 and 1850 were passed in .................. .

(A) Japan

(B) USA

(C) South Africa

(D) India

65. ड्युरांड सीमारेषा कोणत्या देशामध्ये आहे ?

(A) ब्रिटिश इंडिया—रशिया

(B) ब्रिटिश इंडिया—अफगानिस्तान

(C) ब्रिटिश इंडिया—चीन

(D) ब्रिटिश इंडिया—नेपाळ

66. रोमन साम्राज्याच्या ऱ्हास व पतनाचा इतिहास या इतिहासाचा लेखक कोण ?

(A) एडवर्ड गिबन

(B) ऑलिव्हर गोल्डस्मिथ

(C) लॉर्ड ॲक्टन

(D) जी. आर. एल्टन

67. 1793 व 1850 चा गुलाम पलायनाचा कायदा कोठे संमत केला ?

(A) जपान

(B) अमेरिका

(C) दक्षिण अफ्रिका

(D) भारत

68. The British Parliament abolished slavery in the British Empire in the year ......................... .

(A) 1832

(B) 1834

(C) 1833

(D) 1842

69. The first major event of granting rights to people was the signing of ............................ .

(A) Magna Carta

(B) Bill of Rights

(C) Petition of Rights

(D) Declaration of Rights

68. ब्रिटिश साम्राज्यातील गुलामगिरी ब्रिटिश संसदेने यावर्षी रद्द केली :

(A) 1832

(B) 1834

(C) 1833

(D) 1842

69. लोकांना हक्क देणारी पहिली महत्त्वपूर्ण घटना म्हणजे ......................... वर सह्या केल्या गेल्या.

(A) मॅग्ना कार्टा

(B) बिल ऑफ राईट्स

(C) पेटिशन ऑफ राईट्स

(D) डिक्लरेशन ऑफ राईट्स

70. At the instance of the Allies, the Ottoman Empire was dismembered in 1920 by the ..................... .

(A) Treaty of Versailles

(B) Treaty of Amiens

(C) Treaty of Sevres

(D) Treaty of Frankfurt

71. Who among the following Chinese Communist Party leaders, was the most prominent victim of the Cultural Revolution ?

(A) Liu Shao-Chi

(B) Liu Yung Fu

(C) Liu Fang Wei

(D) Ho Lung

70. मित्र राष्ट्रांचा आग्रहामुळे ऑटोमन साम्राज्याचे विघटन कोणत्या तहानुसार करण्यात आले ?

(A) व्हर्सायलीसचा तह

(B) अमिनचा तह

(C) सेव्हर्सचा तह

(D) फ्रँकफर्टचा तह

71. सांस्कृतिक क्रांतीचा महत्त्वाचा बळी ठरलेला चिनी साम्यवादी पक्षाचा नेता कोणता ?

(A) लिउ शाओ ची

(B) लिउ युंग फू

(C) लिउ फांग वाई

(D) हो लुंग

72. Which US President endorsed the Department of state's decision to send volunteers overseas to meet the requirements for skilled manpower ?

(A) Harry S. Truman

(B) Theodore Roosevelt

(C) J.F. Kennedy

(D) George Bush

73. What do you understand by 'Mulatto' ?

(A) Escaped slaves

(B) A person of mixed race, usually with parents of European and African origin

(C) An African

(D) Long-distance trader

72. कुशल मनुष्यबळ मिळवण्यासाठी परदेशात स्वयंसेवक पाठवण्याच्या गृहखात्याच्या निर्णयाचे समर्थन करणारा अमेरिकी राष्ट्राध्यक्ष .......... होय.

(A) हॅरी एस. ट्रूमन

(B) थिओडोर रूझवेल्ट

(C) जे. एफ. केनेडी

(D) जॉर्ज बुश

73. 'मुलाटो' म्हणजे काय ?

(A) पळून गेलेले गुलाम

(B) युरोपीय व अफ्रिकी वंशाच्या आईवडिलांची मिश्र संतती

(C) आफ्रिकन

(D) लांबच्या पल्ल्याचा व्यापारी

74. The turning point in the history of apartheid was de Klerk's announcement in February ......... .

(A) 1990

(B) 1991

(C) 1909

(D) 1919

75. Who wrote, "Man is born free, and everywhere he is shackled" ?

(A) Galileo Galilei

(B) Baron de Montesquieu

(C) Jean-Jacques Rousseau

(D) Adam Smith

74. वर्णद्वेषाच्या इतिहासातला कलाटणी देणारा डी क्लर्क यांच्या घोषणेचा दिवस फेब्रुवारी ..................... मधील होता.

(A) 1990

(B) 1991

(C) 1909

(D) 1919

75. "माणूस जन्मतःच स्वतंत्र असतो पण तो सर्वत्र शृंखलानी जखडलेला असतो." असे कोणी लिहिले ?

(A) गॅलिलिओ गॅलिली

(B) बॅरन-डी-मोन्तेस्क्यू

(C) जीन झाकस् रूसो

(D) ॲडम स्मिथ

**ROUGH WORK**